


दैनिक
# निळे प्रतिक



रतनकुमार साळवे – मुख्य संपादक
एम.ए.(एम.सी.जे.), एम.ए.(फुले-डॉ.आंबेडकर थॉट), एम.ए. (पाली अँड बुद्धिझम)
मो. ८९०८८६७७७७

● छत्रपती संभाजीनगर ● वर्ष : २ रे ● अंक : ३८ वा ● शनिवार दि.१३ सप्टेंबर २०२५ ● किंमत ५.०० रू ● पाने : ०४ ● nilepratik02@gmail.com ● दैनिक

# ठाकरे बंधूंची महायुती!

## दसऱ्यापासून राज-उद्धव एकत्र येत राजकीय भूकंप घडवणार

### मुंबई पालिका ते राज्य निवडणुका एकत्र लढणार-चंद्रकांत खैरेंची मोठी घोषणा

**महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर एक धमाकेदार वळण! उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे दोन ठाकरे बंधू आता एकत्र येणार आहेत, आणि तेही थेट दसरा मुहूर्तावर! शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची (मनसे) राजकीय युती आता निश्चित झाली असून, आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीसह राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत हे दोघे भाऊ खांद्याला खांदा लावून लढणार आहेत. ही स्फोटक घोषणा खुद्द ठाकरे गटाचे ज्येष्ठ नेते आणि माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी केली आहे, ज्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.**





**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**छत्रपती संभाजीनगर । वृत्तसंस्था**

गेल्या काही दिवसांपासून ठाकरे बंधूंच्या भेटीगाठींचा सिलसिला जोरात सुरू होता. नुकतंच उद्धव ठाकरेंनी राज ठाकरेंच्या 'शिवतीर्थ' निवासस्थानी जाऊन तब्बल पावणेतीन तासांची गोपनीय चर्चा केली. या भेटीने महाराष्ट्रातल्या राजकीय हवेत एक नवीन उत्तेजना निर्माण झाली होती. आता चंद्रकांत खैरेंनी या युतीचा 'शुभ मुहूर्त' जाहीर केल्याने, ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्याची अफवा आता वास्तवात बदलली आहे. हे एकत्र येणे महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा भूकंप घडवणार असल्याची चर्चा आहे!हे ठाकरे बंधूंचे एकत्र येणे महाराष्ट्राच्या राजकारणात नव्या अध्यायाची सुरुवात ठरेल का? दसरा मेळावा येत्या काळात काय धमाका करेल, हे पाहणे रोमांचक ठरणार आहे!

#### चंद्रकांत खैरेंची धडाकेबाज घोषणा

जनतेला दोन भावांचे सरकार हवे आहे! मुंबई महापालिका निवडणुकीसह राज्यातील येणाऱ्या सर्व स्थानिक निवडणुकीत शिवसेना आणि मनसे एकत्र लढणार आहेत. येत्या विजयादशमीपासून उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र दिसतील – हा एकत्र येण्याचा शुभ मुहूर्त आहे! असं खैरे म्हणाले. या वक्तव्याने विरोधकांच्या भुवया उंचावल्या आहेत, तर ठाकरे समर्थकांमध्ये उत्साहाचे वारे वाहू लागले आहेत. मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रातील निवडणुकीचे समीकरण हे युतीमुळे पूर्णपणे उलटेपालटे होणार आहेत – भाजप, राष्ट्रवादी आणि काँग्रेससारख्या पक्षांना हे नवे आव्हान कसे पार करायचे, याची चिंता आता वाढली आहे.

#### विदर्भातील शेतकऱ्यांचा मुद्दाही गाजवला

युतीची घोषणा करतानाच खैरेंनी विदर्भातील शेतकऱ्यांच्या दु:खाकडे लक्ष वेधले. मुसळधार पावसाने शेतीचे प्रचंड नुकसान झाले असून, 'ओला दुष्काळ' जाहीर करण्याची मागणी त्यांनी केली. मुख्यमंत्री विदर्भाचे आहेत, उद्या ते मोरारी बापूंच्या दर्शनासाठी येत आहेत. धार्मिकता चांगली, पण यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी हवालदिल झाले आहेत. शेतात चिखल आणि पीक उध्वस्त! मुख्यमंत्र्यांनी तातडीने ओला दुष्काळ घोषित करून शेतकऱ्यांना मदत द्यावी, असं ते म्हणाले. ही मागणी राजकीय युतीच्या पार्श्वभूमीवर आणखी चर्चेत आली आहे.

## छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका शहर पथविक्रेता समिती निवडणुकीसाठी आरक्षण निश्चिती सोडत प्रक्रिया

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका अंतर्गत शहर पथविक्रेता समिती निवडणुकीच्या पारदर्शक आणि सुव्यवस्थित प्रक्रियेसाठी आरक्षण निश्चित करण्यासाठी महत्त्वाची सोडत प्रक्रिया १५ सप्टेंबर २०२५ रोजी पार पडणार आहे.केंद्र शासनाच्या पथविक्रेता उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन अधिनियम २०१४ अन्वये महाराष्ट्र राज्य कामगार आयुक्त, मुंबई यांच्या आदेशानुसार उप आयुक्त ०२ यांना छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका पथविक्रेता समिती सदस्यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.महानगरपालिकेच्या मुख्यालय येथे दुपारी १२:०० वाजता आयोजित होणाऱ्या या सोडत प्रक्रियेत एकूण २० सदस्यांच्या पथविक्रेता समितीपैकी ८ सदस्यांसाठी आरक्षण निश्चित करण्यात येणार आहे. शासनाने नमूद केलेल्या नियमानुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इमाव, अल्पसंख्यांक, दिव्यांग व्यक्ती व महिलांसाठी आरक्षण राखण्यात आले आहे. विशेषत:, या ८ सदस्यांपैकी ३/१ भाग महिलांसाठी आरक्षित ठेवण्यात आला आहे.या अनुषंगाने, इच्छुक पथविक्रेत्यांनी १५ सप्टेंबर रोजी दुपारी १२:०० वाजता महानगरपालिका मुख्यालय येथे हजर राहून आरक्षण निश्चिती प्रक्रियेत सहभाग घेण्याचे आवाहन उप आयुक्त ०२ व निवडणूक निर्णय अधिकारी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी केले आहे.या प्रक्रियेमुळे आगामी निवडणूक अधिक पारदर्शक, न्याय्य व सर्वसमावेशक पद्धतीने पार पडेल, असे प्रशासनाचे मत आहे.

## गौताळा अभयारण्यात सापडलेल्या मृतदेहाच्या हत्येचा उलगडा-आरोपी जेरबंद

### छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) पोलीसांनी कारवाई करून गुन्हा उघडकीस आणला

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

दिनांक ०३/०९/२०२५ रोजी पोस्टे कन्नड ग्रामीण हद्दीतील गौताळा अभयारण्यात सायगव्हाण शिवारात गट नं. ७५ सनसेट पाँईट जवळील घनदाट जंगलात, २५ ते ३० वयोगटातील अज्ञात इसमाचा मृतदेह अर्धवट मुंडके अवस्थेत सापडला होता. मृतदेहाच्या गळयाचा भाग कापलेला असून जबडयात एक क्लिप बसवलेली आढळली होती. पोलीस ठाणे कन्नड ग्रामीण येथे दिनांक ०४/०९/२०२५ रोजी गुन्हा क्र. २२४/२०२५ कलम १०३ (१), २३८ बीएनएस नुसार दाखल करण्यात आला. पोलीस



अधीक्षक डॉ. विनायकुमार राठोड व अपर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विजयसिंह राजपूत यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेने तातडीने तपास सुरु केला. तपासात समोर आले की, मृतकाच्या अंगावर असलेली क्लिप संबंधित रुग्णालयात बसविण्यात आली होती. तपासाअंती मृतकाची ओळख निखिल हिरामण सूर्यवंशी (वय २८, रा. सिंदी, चाळीसगाव) असे झाली. तपासादरम्यान मृतकाचा मित्र श्रावण ज्ञानेश्वर धनगर याने कबूल केले की, निखिलने त्याला छत्रपती संभाजीनगर येथे आपल्या मैत्रिणीला भेटायला जाण्याचा प्रस्ताव दिला होता. सनसेट पाँईट जवळ नेल्यावर वादविवादातून श्रावणने कु-हाड वापरून निखिलचा हत्या केली. स्थागुशा पथकाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे श्रावण ज्ञानेश्वर धनगर याला ताब्यात घेऊन न्यायालयीन कारवाईस सादर करण्यात आले आहे. सदर प्रकरणाचा अधिक तपास सुरू असून आरोपीविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यासाठी पुढील प्रक्रिया राबवली जात आहे.

पोलीस प्रशासनाचा संदेश: सर्व नागरिकांनी गैरकृत क्रियाकलापांविरुद्ध तत्परतेने पोलिसांना सूचित करावे, सुरक्षिततेसाठी आपला सहभाग अत्यंत आवश्यक आहे.

## हैदराबाद मुक्ती संग्राम दिनानिमित्त राज्य मंत्रिमंडळाची बैठक आयोजित करा-डॉ.संजय लाखेपाटील

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

मराठवाडा अनुशेष निर्मूलन आणि विकास मंचाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय लाखेपाटील यांनी येत्या १७ सप्टेंबर २०२५ रोजी हैदराबाद मुक्ती संग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर राज्य मंत्रिमंडळाची दोन दिवसांची बैठक छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित करण्याची आग्रही मागणी केली आहे.डॉ. लाखेपाटील म्हणाले की, राज्यातील विविध प्रलंबित विकास प्रश्न सोडविण्यासाठी आणि मराठवाड्याला मिळणाऱ्या निधीची स्पष्टता दाखविण्यासाठी अशा बैठकीचे आयोजन आवश्यक आहे. विदर्भ भागाला दरवर्षी नागपूर येथे विधिमंडळ अधिवेशन घेण्याची परंपरा असून मराठवाड्यासाठीही अशा बैठकीची व्यवस्था व्हायला हवी.ते पुढे म्हणाले की, राज्य सरकारने ४ ऑक्टोबर २०१६ रोजी मंजूर केलेल्या ४९,०२० कोटींच्या प्रकल्पांचा काय फायदा झाला,



याचीही माहिती मराठवाड्यातील जनतेला दिली पाहिजे. तसेच, हैदराबाद मुक्ती संग्रामाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त मंजूर झालेल्या ४२,०२० कोटींच्या प्रकल्पाची पूर्ण अंमलबजावणी करण्यासाठी निधी तातडीने उपलब्ध करावा, अशीही मागणी त्यांनी केली.जर १६/१७ सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजी नगर येथे राज्य मंत्रिमंडळाची बैठक आयोजित झाली नाही, तर हैदराबाद मुक्ती संग्राम दिनी जालन्यासह मराठवाड्यातील विविध ठिकाणी हुतात्मा स्मारक समोर लाक्षणीक उपोषणाची योजना करण्यात येत आहे. यासाठी सामाजिक संघटना, विकासप्रिय संघटनांबरोबरच राजकीय पक्षांना सहभागी होण्यासाठी आवाहन करण्यात येत असल्याचेही डॉ. लाखेपाटील यांनी स्पष्ट केले.या पत्रकार परिषदेत मराठवाडा अनुशेष निर्मूलन आणि विकास मंचाचे कार्याध्यक्ष सतीश पट्टेकर, जिल्हाध्यक्ष आनंद लोखंडे, दिनेश फलके, सुभाष कोळकर, शरद देशमुख, ज्ञानेश्वर कदम, राजेंद्र दाते पाटील, धनंजय देशमुख, अविनाश वारकरी, राहुल लांडगे, दीपक डांगरे, सचिन दाभाडे, मनोज बोर्ड आदी उपस्थित होते.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार; आरोपीला फाशी द्या बंजारा समाजाचा पोलिस अधिक्षक कार्यालयात ठिय्या

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**परभणी । संजय बगाटे**

गंगाखेड तालुक्यातील महातपुरी तांडा येथील अल्पवयीन मुलीवर चाकूचा धाक दाखवून अत्याचार करणाऱ्या नराधमास फाशीची शिक्षा द्या या मागणी साठी गोर सेना संघटनेच्या संतप्त जमावाने पोलिस अधिक्षक कार्यालयात ठिय्या मांडला. अपर पोलीस अधीक्षक सूरज गुंजाळ यांच्या आश्वासनामुळे जमाव शांत झाला.



महातपूरी रामेश्वर तांडा येथील अल्पवयीन मुलगी दूध घेण्यासाठी घराबाहेर पडली ती घरी आलीच नाही.

शेजारच्याच एका गुंड प्रवृत्तीच्या नराधमाने चाकूचा धाक दाखवून अत्याचार केला. मुलीचा रडण्याचा आवाज ऐकून गावातील लोकांनी धाव घेतली असता. त्या लोकांनाही त्या युवकाने धमकावत असल्याचे सांगितले.

पीडित मुलीच्या कुटुंबियांना जीवे मारण्याची धमकी देत असल्याने गावात दहशतीचे वातरण आहे.

पोलिस प्रशासनाने त्या अत्याचार करणाऱ्या नराधमास अटक करून फाशी ची शिक्षा द्यावी. नराधमाची संपत्ती जप्त करून पीडित मुलीच्या कुटुंबियांना द्यावी व पीडित परिवारास पोलिस संरक्षण द्यावे. गुन्हेगारी पार्श्वभूमी असल्यानं काही पोलीस त्याला मदत करतील अशा पोलिसांवर ही कारवाई करावी अशी मागणी ठिय्या आंदोलनातून केली आहे. मोठ्या संख्येने गोर सेना संघटनेच्या पदाधिकारी सह महातपूरी रामेश्वर तांडा येथील बंजारा समाज बांधव सहभागी होते.

संपादकीय

# गुरुजी तुम्हाला हे शोभलं का?

शिक्षण क्षेत्र म्हणजे समाजाच्या उंचीवर नेणारी पायरी असावी, आदर्श शिक्षक हे विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्त्रोत असावे अशी अपेक्षा असते. मात्र, अलीकडेच छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद आयोजित आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण समारंभात घडलेली घटना या अपेक्षेवरची थेट दगाबाजी ठरली. संत एकनाथ रंग मंदिर येथे आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा चालू असताना सभागृहाबाहेर आदर्श शिक्षकांचे एकमेकांशी होणारे तोंडी वाद थेट हातापायाकडे वळले, एकमेकांचे कपडे फाडण्यापर्यंतच्या पातळीवर पोहोचले, पोलीसात तक्रार दाखल करण्यासाठी गेले असता, वैद्यकीय तपासणीसाठी जाण्याचा कटाक्षही आला.ही केवळ एक घटना नाही, हे एक गंभीर सामाजिक प्रश्न आहे. शिक्षकांनी आपल्याला 'शिक्षणाचे आदर्श स्तंभ' मानूनच शिक्षकांनी प्रतिष्ठा राखायची असते, त्याऐवजी फक्त वैयक्तिक वादातून आपला उद्धार करीत असलेले शिक्षक आपल्या वागणुकीने सर्वसामान्य नागरिकांमध्ये प्रश्न निर्माण करत आहेत. सोशल मीडियावर सुरू असलेले तोंडी वाद हे प्रत्यक्षात बदलून कपडे फाडण्यापर्यंत पोहोचले, परंतु कोणतीही तक्रार न देता प्रकरण मिटवण्याचा प्रयत्न केला गेला. कारण आपली बदनामी होईल, गुन्हे दाखल होतील, शासकीय दरबारी समस्या उद्भवेल, अशी भीती वाटली असेल,खरे तर असे फालतू प्रकार करता कशाला..? हे आदर्श शिक्षकाला न शोभणारी कृती आहे.

हे केवळ निष्पक्षतेच्या विरुद्धच नाही, तर या मुळे उत्तरदायित्वही फाटले आहे. निरागस, विद्यार्थ्यांना आदर्श शिक्षण देण्याचे दायित्व घेणाऱ्या शिक्षकांनी स्वतःच अशा प्रकारच्या वर्तनातून काय संदेश द्यायचा? शिक्षण क्षेत्रातील प्रत्येक व्यक्तीने आपले आचरण अधिक जबाबदारीने आणि शिस्तबद्ध पद्धतीने ठेवले पाहिजे. अन्यथा, शिक्षणाची शान तर जाईलच, शिक्षकांविषयी असलेला आदर्श हळूहळू हरवला जाईल.जिल्हा परिषदेसोबतच शिक्षण विभागाच्या उच्च अधिकाऱ्यांनीही या घटनेवर कठोरपणे विचार करावा. अशा प्रकारच्या घटना उद्भवल्या की त्यावर तातडीने आणि स्पष्ट कारवाई करणे आवश्यक आहे. अन्यथा, शिक्षक हे आदर्श म्हणून उभे राहण्याऐवजी वाईट उदाहरण म्हणून विद्यार्थ्यांच्या मनावर ठसा उमटवतील.आदर्श शिक्षक पुरस्कार म्हणजे शिक्षण क्षेत्रातील शिस्त, कर्तव्यनिष्ठा आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याची उंची दाखवणारा मानाचा सन्मान असतो. आज ही प्रतिष्ठा काही शिक्षकांच्या अनैतिक वर्तनामुळे धोक्यात आली आहे. त्यामुळे सर्व शिक्षकांनी आपले वर्तन पुनर्विचारावे, समाजाच्या अपेक्षांना उत्तर द्यावे आणि खरी आदर्शता फक्त पुरस्काराच्या नावात नव्हे, तर प्रत्येक कृतीत सिद्ध करावी. कालच्या घटनेवर आज सर्वजण हा प्रश्न विचारतात.

गुरुजी तुम्हाला हे शोभलं का?

समाजाची अपेक्षा आणि विद्यार्थ्यांचे भविष्य यासाठी आदर्श शिक्षक होण्याची खरी जबाबदारी स्वीकारा.

# 'वारसा' जपण्याचा ध्यास

वारसा... एका पिढीकडून पुढच्या पिढीकडे सुपूर्द केला जाणारा खजिना. मग तो ज्ञानाचा असो, अनुभवाचा, कलेचा किंवा परंपरेचा. हा वारसाच माणसाचं आयुष्य समृद्ध आणि सुसंस्कृत बनवतो. कोल्हापूरसारख्या ऐतिहासिक महत्त्वाच्या ठिकाणी तर कला, क्रीडा, परंपरा, इतिहास या साऱ्याचा वारसा अनेकविध रूपांमध्ये दिसतो. एकीकडे आसमंतात पन्हाळगड–विशाळगडसारखे शौर्यगाथांचे खंबीर साक्षीदार, तर दुसरीकडे मातीतल्या कुस्तीसारख्या खेळाची रग अंगात भिनलेली... या अशा मातीत छत्रपती शिवरायांसारख्या द्रष्ट्या सेनानीने रुजवलेली 'शिवकालीन युद्धकला' फुलली नसती तरच नवल!बलाढ्य आणि शस्त्रसज्ज मुघल सेनेशी मोजके मावळे आणि तुटपुंजी शस्त्रं घेऊन लढताना शिवरायांनी गनिमी काव्याचा अफलातून वापर केला. यासाठी शिवरायांनी जी शस्त्रविद्या विकसित केली, तीच शिवकालीन युद्धकला. पुढे इंग्रज राजवटीत युद्धासाठी तिचा वापर थांबला, तरी कला म्हणून ती जिवंत राहिली; किंबहुना कित्येक वस्तादांनी आपलं आयुष्य खर्ची घालून ती जिवंत ठेवली. आज मात्र या समृद्ध वारशाला काहीशी उतरती कळा लागली असून शासकीय आणि एकूणच अनास्थेमुळे इतका अमूल्य ठेवा उपेक्षित आणि दुर्लक्षित राहिला आहे... हे सगळं एका तरुण सर्जनशील कलावंताच्या नजरेस पडलं. हा तरुण मूळचा कोल्हापूरचाच. मुंबईत एका प्रथितयश जाहिरात संस्थेत अनेक वर्षे काम केल्यानंतर आपल्या गावात राहून आपल्याला भावणाऱ्या विषयांवर काम करावं हा ध्यास घेतलेला. त्याचं नाव सचिन सूर्यवंशी. कोल्हापूरकरांचं अलौकिक फुटबॉलप्रेम हा विषय घेऊन त्यानं माहितीपट बनवला, 'द सॉकर सिटी'. या माहितीपटाला फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. या पुरस्कारानं त्याचा आणि त्याच्या साथीदारांचा हुरूप वाढला. त्यानंतर अचानक त्याच्यासमोर विषय आला तो म्हणजे मर्दानी खेळ, अर्थात 'शिवकालीन युद्धकला'. आपल्या चिकित्सक स्वभावाला अनुसरून सचिननं त्या विषयाच्या अभ्यासात स्वतःला झोकून दिलं. या विषयावर एक सखोल माहितीपट करण्याची गरज आहे, हे त्याला जाणवलं. मग या विषयाशी संबंधित वाचन, संशोधन, त्यातील तज्ज्ञ व्यक्तींच्या भेटीगाठी अशी सगळी तयारी करून कामाला सुरुवात झाली. पाठीशी कुणी मोठा निर्माता किंवा आर्थिक पाठबळ नसलं तरी प्रचंड ध्यास आणि मित्रांचा मदतीचा हात या भांडवलावर काम सुरू झालं. मर्यादित साधनं, विशेषतः आर्थिक मर्यादा लक्षात घेत काटेकोर नियोजन करून काम करणं आवश्यक होतं. काही गोष्टी चित्रित करण्यासाठी मोठा कॅमेरा आवश्यक असला तरी सतत कॅमेरा भाड्यानं घेणं परवडणार नाही, हे लक्षात घेऊन काही भाग हा मोबाइल फोनचा कॅमेरा वापरून शूट करायचं ठरलं. अर्थात मोबाइलचा कॅमेरा आणि विशेषतः माईक यांच्या मर्यादा हे महत्त्वाचं आव्हान पेलायचं होतं. हा माहितीपट असला तरी फक्त लोकांच्या मुलाखती घेऊन आणि शस्त्रांची छायाचित्रं टाकून विषय संपवायचा नव्हता. शस्त्रं चालवतानाचे शॉट्स, त्यामागील सुरसरम्य कथा सांगणारी मंडळी, मर्दानी खेळ शिकवणारे वस्ताद, शिवाय या खेळाचा इतिहास, त्यात शिवरायांपासून महाराणी ताराराणी ते राजर्षी शाहू महाराज या सर्व थोर व्यक्तींचं योगदान असा खूप मोठा पट मांडायचा होता; तोही मर्यादित कालावधीत आणि परिणामकारक पद्धतीनं. यातील काही भाग (उदा. शिवरायांच्या मावळ्यांचे प्रसंग, त्यांची मनःस्थिती) हा काल्पनिक (फिक्शन) पद्धतीनं दाखवायचं ठरलं; तर जिजाऊंपासून बाजीप्रभू देशपांडे यांच्यापर्यंत पराक्रमाच्या गाथा निमेशनच्या माध्यमातून मांडायचं ठरलं.आणि एक दिवस अचानक मला सचिनचा फोन आला. 'मी सध्या एका माहितीपटावर काम करत आहे. आपण दोघांनी एकत्र काम करावं, अशी अनेक वर्षांपासूनची इच्छा आहे. या माहितीपटात शस्त्रांचे आवाज आणि एकूणच ध्वनीची महत्त्वाची भूमिका आहे. तेव्हा तू हे काम करावंस असं मला वाटतं.' त्याआधी मी सचिनशी माझी फक्त एकदाच भेट झालेली. पण एका भेटीतच आमचे सूर जुळलेले. त्याच्यासोबत काम करण्याची संधी मलाही हवीच होती...मग 'वारसा'च्या साऊंडवर चर्चा झाली.

# चातुर्य शहाणें झालें...

आधुनिक मनोविकारशास्त्रावरची मान्यताप्राप्त पुस्तके लिहिली पाश्चिमात्य संशोधकांनी. मॉडर्न मेडिसिनचा उगम तिथला. आमचे रुग्ण इथले! पाश्चात्य समाजात व्यक्तीच्या अंतस्थ प्रेरणा, इच्छा, भावना यांचा मुक्त आविष्कार हा त्यांच्या स्वभावाचा सर्वमान्य गाभा. या उलट पौर्वात्य संस्कृतीत माणूस हा या समाजसंस्थेचा एक पूरक घटक आहे. संस्कृती केंद्रस्थानी, माणूस तिच्या नियमांनी बांधलेला. पाश्चिमात्य समाजात व्यक्ती केंद्रस्थानी, पौर्वात्य संस्कृतीत समष्टी. कुठले चांगले कुठले वाईट हा प्रश्न नाही, हा संस्कृतीतला मूलभूत फरक.



रुग्ण डॉक्टरकडे विकृती घेऊन येतो तशी संस्कृतीही घेऊन येतो. मानसिक विकारांत तर रुग्णाची लक्षणे, विकाराचे स्वरूप आणि उपचाराची दिशा सारेच त्याच्या सांस्कृतिक मानमान्यतेच्या रंगात भिजलेले. आफ्रिकेपासून अमेरिकेपर्यंत जगभरात कुणालाही होवो, मोतीबिंदू आणि कर्करोगाची लक्षणे आणि उपचार यांत फरक नाही; मात्र स्किझोफ्रेनियात होणारे भास–भ्रम, त्यांचे स्वरूप, उपचाराची दिशा यावर रुग्णाच्या पारंपारिक समजुती आणि संस्कृती याचा मोठा प्रभाव पडतो. सुशिक्षित, शहरी माणसांवर कमी पडत असेल, अर्धनागरी रुग्णांवर अधिक असेल. लोक माझ्या विरुद्ध आहेत, कुणी माझ्या वाईटावर आहे, असे संभ्रम संशयी स्किझोफ्रेनियात नेहमी दिसतात. मात्र छोट्या गावात अगदी शारीरिक आजार झाला तरी असे संशय जवळजवळ प्रत्येकजण व्यक्त करतो. ती त्यांची परंपरेने चालत आलेली विचारसरणी. त्याचा स्किझोफ्रेनियाशी संबंध जोडावा की जोडू नये हे ठरवणे, उपचारातही अशा समजुतींचा उपयोग रुग्णाच्या भल्यासाठी करता येणे ही सूज्ञता. दरवेळी ती डॉक्टरच दाखवतो असे नाही, रुग्णाचा हुशार नातेवाईकही दाखवतो!

माझ्याकडे एक माणूस आपल्या तरुण मुलीला स्किझोफ्रेनियाच्या उपचारासाठी घेऊन येई. तिला वर्षा–दोन वर्षाला त्रास होत असे. औषधोपचार केला की ती त्वरित बरी होऊन परत जाई. दरम्यान, त्याने तिचे लग्न लावून दिले. मुलगी सासरी गेली. वर्षभरात तिला पुन्हा झटका आला. बाप लगेच धावला, सासरहून पोरीला उचलून थेट माझ्याकडे आला. नेहमीप्रमाणे काही दिवसांत ती पूर्ण बरी झाली. मी विचारले, तू जावयाला, व्याह्याला काय सांगितलेस? तो म्हणाला मी त्यांना आधीच कल्पना दिली आहे, की आमच्या घराण्यावर करणीचा प्रभाव आहे. त्याचा त्रास वर्ष–दोन वर्षाला आमच्या मुलीला भोगावा लागतो. पण काळजी करू नका, मी लगेच त्याचा बंदोबस्त करून टाकत जाईन! उपचार तुमच्याकडेच, कारण हा आजार आहे हे मला पक्के ठाऊक आहे. मनोविकारांच्या वर्गीकरणाची अमेरिकास्थित सर्वोच्च संस्था आपल्या 'डायग्नोस्टिक ॲन्ड स्टॅटिस्टिकल मॅनुअल'च्या ताज्या पाचव्या आवृत्तीत काय म्हणते? 'मनोविकार हे माणसांच्या संस्कृतीशी बांधले गेले असल्याने, त्यांचा उपचार करताना रुग्णाच्या बिलिफ सिस्टीमचा, म्हणजे थोडक्यात त्याच्या पारंपारिक समजुतींचा उपयोग करून घेतला पाहिजे.' या बापाने पोरीचा संसार सुरळीत व्हावा म्हणून दुसरे काय केले? पाव शतकाच्या प्रवासात निघालेला हा निष्कर्ष.

मानसशास्त्राचा उगम तत्त्वज्ञानातून झाला. तत्त्वज्ञान हा रोजच्या जगण्याचा गाभा, मात्र विनोबा म्हणतात तसे 'तत्त्वज्ञान हे म्हातारपणी वाचायचे असते या समजुतीमुळे तारुण्य आणि तत्त्वज्ञान दोन्ही वाया जाते!' आत्मस्वीकार ही अनेक मानसिक समस्यांवर उताऱ्याची पाहिली पायरी, मात्र त्यासाठी तत्त्वदृष्टी हवी.

मेंदूतील लिंबिक सिस्टीम हे भावनेचे केंद्र तीस कोटी वर्षांपूर्वीचे, तर पूर्व–प्रमस्तिष्क हे तर्कबुद्धीचे केंद्र फक्त दोन कोटी वर्षांपूर्वीचे. म्हणून तर्काधारित विचारवृत्तीवर भावना प्रभावी ठरतात हेही लक्षात ठेवणे गरजेचे.

मानसिक विकार हे मेंदूतील रसायनांच्या असमतोलामुळे होतात हे खरे, पण या न्युरोट्रान्समिटर्सवर भोवतालच्या घटनांचा, आणि त्या घटना आमच्या मनात कसे तरंग निर्माण करतात याचा निश्चित परिणाम होतो. समजुती अवैज्ञानिक असतील, पण त्यांच्या परिणामाचे एक विज्ञान आहे. त्या तथ्यहीन असतील, पण त्यांचा मनावर घडून येणारा परिणाम मात्र तथ्यपूर्ण असतो, बरा किंवा वाईट दोन्ही अर्थाने. संपूर्ण वैज्ञानिक प्रयोगांनी सिद्ध केलेल्या औषधांना 'प्लेसिबो' इफेक्टच्या कसोटीतून जावे लागते, तो प्लेसिबो इफेक्ट काय? वैद्यकशास्त्रात एखाद्या औषधाची उपयुक्तता सिद्ध करायची असली तर त्याचा प्रयोग करताना सहसा रुग्णांचे दोन किंवा तीन गट पाडले जातात. एका गटाला खरे औषध, एका गटाला कुठलेच औषध नाही आणि एका गटाला औषधाच्या जागी कुठलीही उपयुक्तता नसलेली, निरुपद्रवी साखरेची गोळी देण्यात येते. अशा निरुपद्रवी औषधाला 'प्लेसिबो' म्हणतात. या प्लेसिबोमुळे अनेक आजारात रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ३० ते ५० टक्के एवढे दिसून येते. 'खरे औषध' प्लेसिबोपेक्षा सांख्यिकीदृष्ट्या जास्त प्रभावी असेल तरच ते उपयुक्ततेची कसोटी पार करते असे समजले जाते. सहसा मानसिक आजारात प्लेसिबो परिणाम जास्त दिसून येत असला तरी माणसाला ग्रासणाऱ्या अतिरक्तदाबापासून कर्करोगापर्यंत सगळ्याच प्रकारच्या शारीरिक आजारात, आपण औषधाने बरे होणार या कल्पनेने माणसांना कमी–अधिक प्रमाणात बरे वाटू लागते हे शास्त्रीय सत्य आहे. शरीरावर चेतासंस्थेचे नियंत्रण आणि चेतासंस्थेवर मेंदूचे, पर्यायाने मनाचे नियंत्रण; त्यामुळे आपली इच्छाशक्ती, स्व–जाणीव, अपेक्षा इत्यादींच्या एकत्रित परिणामातून माणूस व्याधीमुक्त होतो.

प्लेसिबो इफेक्ट फक्त औषधापुरता मर्यादित नाही. डॉक्टरचा रुग्णांसोबत घडून येणारा संवाद उपचारावर आणि दुरुस्तीवर प्रभाव टाकणारा महत्वाचा घटक. रुग्ण, अमुक डॉक्टरच हवा असे का म्हणतात? कारण, तोच मला ठीक करेल, ही समजूत. यात त्या डॉक्टरचे कौशल्य, अनुभव, ज्ञान जितके महत्वाचे, तितकाच रुग्णाचा विश्वास. शेवटी समजुती या सामुहिक अनुभूतीतून आलेल्या असतात. चार लोक त्याला सांगतात, अमुक डॉक्टरने मला याहीपेक्षा मोठ्या व्याधीतून दुरुस्त केले आहे.

मनोविकारांची लक्षणे कधीकधी एखाद्या खोल डोहाच्या पृष्ठभागावर उमटलेले तरंग असतात. ते वरवर जसे दिसतात, जसे दाखवतात तशी नसतात. त्यासाठी तज्ज्ञाला रुग्णाची नुसती मानसिकता नाही, प्र–मानसशास्त्र शोधावे लागते. मेटा सायकॉलॉजी. मानसिकतेची मानसिकता. त्याला रूढ निदानाच्या पलीकडे जाता आले पाहिजे. ते अनुभवाने येते. चिंतनाने येते. दुर्दैवाने सगळ्यांना येते असे नाही.

कुत्र्याची भीती वाटणे हे मर्यादेत नॉर्मल. कुत्र्याची अकारण, अवास्तव भीती वाटणे हा फोबिया, मानसिक समस्या. मात्र मनाच्या खोल डोहात दडलेला अपराधभाव, त्यामुळे निर्माण होणारी दुश्चिंता (एंक्झायटी), ती कमी करण्यासाठी आत्मपीडेची सुप्त प्रेरणा हे व्यक्तीचे प्र–मानसशास्त्र. कुत्रा चावण्याच्या प्रकट दुर्भितीच्या तळाशी आत्मपीडेची सुप्त इच्छा वावरत असू शकते याचा थांग कुणाला लागेल? ग्रेसच्या शब्दांत...

मन कशात लागत नाही, अदमास कशाचा घ्यावा<br>
अज्ञात झऱ्यावर रात्री मज ऐकू येतो पावा...<br>
पाव शतकाचा रियाझ घडल्यावर अधूनमधून ऐकू लागतो आठवा सूर, अज्ञात पाव्याचा, आणि 'प्रमेय रुचीस' येऊ लागते!

# दिलखुलास देश –'फ्रान्स'

मी मूळचा नगर जिल्ह्यातील श्रीरामपूरचा आणि अस्सल मराठी कुटुंबात लहानाचा मोठा झालेला. माझेही बालपण चारचौघांप्रमाणेच गेलेले आहे. अभ्यासात मी बरा होतो आणि नेमून दिलेले काम पूर्ण करायचेच, हा माझा स्वभाव होता. या माझ्या स्वभावानुसार पुरेसा अभ्यास करून मी 'वाइन टेक्नॉलॉजी'मध्ये पदवी घेतली आणि त्यानंतर पदव्युत्तर शिक्षणासाठी 'एमबीए मार्केटिंग'चा पर्याय निवडून पार पाडला. पदव्युत्तर शिक्षण घेऊन नोकरी करायची वेळ आल्यावर लक्षात आले, की मी ज्या वाइन उत्पादन क्षेत्रात काम करू इच्छित आहे, त्या क्षेत्रात एमबीए मार्केटिंग केल्यावर मला फक्त सरोगसी मार्केटिंग म्हणजेच 'अप्रत्यक्ष जाहिरात' (उदा. 'इंपीरिअल ब्लू – मेन विल बी मेन') करावी लागणार होती आणि ते मला अजिबातच रुचणारे नव्हते. कारण भारतात वाइन किंवा लीकर उत्पादनांची थेट जाहिरात करण्यास बंदी आहे. त्यामुळे मग वाइन उत्पादन क्षेत्रात काम करावे, हा विचार मनात डोकावू लागला. त्यासाठी वाइन उत्पादनातील उच्च शिक्षण घेणे अपरिहार्य आहे आणि भारतात एकही संस्था वाइन उत्पादनातील उच्च शिक्षण देणारी नाही, ही बाब समोर आली. खरे सांगतो, उच्च शिक्षणाचा विचार करेपर्यंत, परदेशात शिकायला जाऊ, तिथे सेटल होऊ, असे एकही स्वप्न मला केव्हाही पडलेले नव्हते. पण आता पर्यायच नव्हता. त्यामुळे २००१मध्ये मी जगभरात वाइन कॅपिटल म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या फ्रान्समधील बोर्दो येथे जाण्याचा निर्णय घेतला.बोर्दोला कॉलेजमध्ये गेल्यावर पहिल्यांदा धक्का बसला तो शिक्षकांमधील नाते पाहून. एकमेकांना नावाने हाक मारणारे शिक्षक असतात, हेच मुळी मला नवीन होते. इथले शिक्षक सगळ्या विद्यार्थ्यांना छान समजून घेऊन समजून सांगून पुढे नेत. कोणीही कुठलीही संकल्पना मांडो, शंका विचारो, त्याची उत्तरे देण्यासाठी शिक्षक तत्पर होते. प्रयोग करायला वाव होता. सुरुवातीच्या काही दिवसांनी इथे अर्थाजनाची व्यवस्था पाहणे भाग असल्याने मी स्कॉलरशिपसाठी अर्ज केला. पण स्कॉलरशिप फक्त फ्रेंच विद्यार्थ्यांसाठी असल्याचे समजल्यावर, आता काय? असा प्रश्न आ वासून समोर उभा राहिला. त्या वेळी माझ्या शिक्षकांनी मला इंग्रजी शिकवण्याचा पर्याय सांगितला. त्या शिकवण्याच्या बदल्यात माझा खर्च भागेल इतकी रक्कम मला कॉलेजने स्टायपेंडच्या रूपात उपलब्ध करून दिली. स्वातंत्र्य आणि मुक्त वातावरण, आनंद किंवा लक्झरी या फ्रान्सच्या मातीत रुजलेल्या गोष्टी आहेत.या देशात जे आहे ते निगुतीने जोपासून त्यातून उत्पन्न कसे मिळेल, कसे वाढेल आणि त्याचा देशाला कसा उपयोग होईल, याचा काटेकोर विचार केला जातो. हा विचार इथल्या नागरिकांमध्ये रुजावा यासाठी अगदी शाळेपासून सरकार लक्ष देऊन असते. माझ्या कॉलेजचेच उदाहरण सांगतो. इथे वाइन उत्पादन शिकणारे विद्यार्थी उद्या व्यवसाय जगतात जाणार आहेत, हे लक्षात घेऊन दर चार महिन्यांनी



प्रकल्पभेटीचे आयोजन करून तिथे प्रत्यक्ष काम करण्याची संधी दिली जाई. कॉलेजची स्वत:ची वाइन डिस्टिलरी आहे. स्वत:चा ब्रँड आहे. इथे विद्यार्थी उत्पादन, ब्रँडिंग, पॅकिंग अशा विविध कामांचा अनुभव घेतात. चोख काम करा. त्या करताना चुका झाल्या तर होऊ देत. त्यातून तुम्ही शिका, असा इथल्या खाक्या आहे. एक कॉलेज संपल्यावर एका वाइन कंपनीत इंटर्नशिप करण्याची संधी मिळाली. दीड वर्ष त्या कंपनीत झोकून देऊन काम केले. 'प्रोफेशनल' म्हणून काम करण्यासाठी मला इथल्या अनुभवांनी प्रचंड बदलून टाकले. मला इंग्रजी बोलता येत असे. सगळ्या भारतीयांप्रमाणे एकाच वेळी चार कामे करण्याचे कौशल्यही होते. त्यामुळे कंपनीच्या उत्पादन, विक्री, जाहिरात आणि अर्थ अशा सगळ्या विभागांत काम केले. हे बघून कंपनीच्या मालकाने अधिकाधिक कामे विश्वासाने माझ्यावर सोपवली आणि गुणवत्तेचे योग्य चीज होणे म्हणजे काय, याचा खराखुरा अनुभव दिला. इथे व्यक्तीच्या कामाला जोखतात. त्याच्या क्षमतांचे कौतुक केले जाते, हा अनुभव मला मिळाला.शिक्षण, नोकरी यासह फ्रान्समधील मित्रमैत्रिणींसह जुळवून घेणे हाही एक भाग होता. हे सारे जण अतिशय स्वतंत्र आणि स्पष्ट; पण दिलखुलासपणे जगणारे होते. त्यांच्यासोबत राहताना येणाऱ्या अनुभवांनी मला विचारांची स्पष्टता द्यायला सुरुवात केली आणि प्रत्येक गोष्टीचा म्हणजे अगदी नात्यांपासन ते प्रोफेशनल कामांच्या पद्धतींपर्यंत सगळ्याचा नव्याने विचार करायला भाग पाडले.या सगळ्या मित्रमैत्रिणींनी मला तिथल्या आचारविचारांशी सहजपणे मला कोणताही न्यूनगंड न देता, चेष्टा न करता परिचय करून दिला. अगदी साध्या गोष्टींचेही मला प्रश्न पडत. काटा–चमच्याने खाता येत नसे. सलाड किंवा चिकन काटा–चमच्याने कसे खायचे, हेच समजेना. काटाचमच्याने खाण्यासाठी बरेच दिवस खटपट करावी लागली. अखेरीस प्रयत्नांनी ते जमले, म्हणजे खरे तर जमवावे लागले. तीच गोष्ट वागण्या–बोलण्याचीही. भारतात सहज होणाऱ्या गोष्टी इथे अगदी अमान्य होत्या. मी पेइंग गेस्ट म्हणून राहत होतो, त्या आजीशी माझी छान मैत्री झाली. तिच्याशी गप्पा मारताना फ्रेंच संस्कृती आणि फ्रेंच माणसाचे राहणे–वागणे मला अधिक उलगडत गेले. 'फ्रान्समध्ये आपण जे कपडे घालतो, त्या एकूण एक कपड्यांना इस्त्री केली जाते आणि तूही ते कर' असे 'बहुमूल्य' ज्ञान तिने मला दिले. नुसते दिले नाही तर माझ्या एकूण एक कपड्यांना स्वतः इस्त्रीही करून माझ्या 'फ्रेंच' होण्याच्या दिशेने पहिले पाऊल टाकायला लावले. माझ्या सगळ्या फ्रेंच मित्रमैत्रिणींच्या मनात भारताविषयी असंख्य प्रश्न होते. भारतात हत्ती, घोडे, सिंह आहेत ना? भारतात गरिबी प्रचंड का आहे आणि मग तुमचे सरकार काही करीत नाही का? तुमच्याकडे जातिभेद प्रचंड आहे का? महात्मा गांधी आणि इंदिरा गांधी यांना का मारले अशा कित्येक प्रश्नांच्या फैरी फ्रेंच मित्रमंडळी माझ्यावर करू लागली होती. इतिहासाचा सखोल अभ्यास मी या प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी फ्रान्समध्ये गेल्यावर केला. ही मंडळी माझ्या घरी येत. मी आमटी भात करून खात असे. त्या वेळी फ्रेंच मित्रमंडळींनी 'तू फार मसालेदार जेवतोस. तुझ्या घरी आले की 'करी'चा वास येतो. तू आमच्या सोबत गाडीत आलास तरी 'करी'चा वास येतो' असे म्हणून त्यांनी माझ्या घराला 'करी हाउस' असे नाव देऊन टाकले होते. यावर काय प्रतिक्रिया द्यावी ते मला कळतच नसे आणि मग हसून गप्प बसत असे. पुढे गाडी घेतली. इथले वाहतुकीचे नियम वेगळे. कार लेफ्ट हँड ड्राइव्ह. ड्रायव्हिंग, ओव्हरटेकिंगच नव्हे, तर रस्त्यावरून गाडी चालवताना माझी गडबड उडायला लागली. शेवटी मराठीमध्ये वाहतुकीचे नियम लिहून गाडीत चिकटवून टाकले. गाडीत बसलो, की आधी नियम पाहायचे असे सुरू केले. मग कुठे गाडी रूळावर आली. दुसरा प्रश्न होता वेळेचा. इथे उन्हाळ्यात सकाळी पाच वाजता सूर्य उगवतो आणि सूर्यास्त रात्री ११ वाजता होतो. दिवस १७ तासांचा आणि रात्र अवघी सहा–सात तासांची. रात्रीचे ११ वाजले तरी सूर्य मावळत नाही, हे माझ्यासाठी नवलाचे होते. अतिप्रचंड उन्हाळा किंवा अतिप्रचंड थंडी इथे नाही. सूर्यप्रकाश असणारा इतका मोठा दिवस असल्याने इथे झाडांची उत्तम आणि भराभर वाढ होते. त्यामुळे निसर्ग समृद्धता विपुल आहे. याचा फायदा वाइन उद्योगाने पुरेपूर करून घेतला आहे. मुळात वाइन शोधली रोमन लोकांनी. कालांतराने ते उत्तर युरोपात आले. आधीच दिलखुलास जगणाऱ्या फ्रेंचांनी आपल्याला मिळालेल्या नैसर्गिक देणगीचा वापर करून वाइन उद्योग इथे रुजवला, वाढवला आणि जगभरात नावाजला जावा यासाठी कष्ट घेतले. त्यासाठी शेतीत प्रयोग केले. फ्रेंचांनी वाइनला प्रतिष्ठा दिली. व्यवसायवृद्धीतून त्यांनी जीवनमान, जीवनशैली अधिक समृद्ध व्हावी, व्यवसायाचा फायदा देशाला व्हावा यासाठी नियोजनबद्ध कष्ट केले. वाइन उत्पादन शिकताना या गोष्टींची नोंद मनात होत होती. यातून माझ्या मनात वाइन उद्योग भारतात कसा रुजवता येईल, त्यासाठी काय करावे लागेल याची चक्रे सुरू झाली. त्यातूनच पुढे वाइन पॉलिसीचा प्रस्ताव मनात रुजला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक रतन नामदेव साळवे यांनी सोलापूर तरूण भारत मिडिया लि., प्लॉट नं. १/३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को. ऑप सोसायटी लि. एमआयडीसी, रेल्वे स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र– ४३१००१) येथे छापून एफ–४/ १४, अयोध्या नगर, एन –७, सिडको छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र– ४३१००१) येथे प्रसिद्ध केले. * संपादक : रतन नामदेव साळवे, मो. ९९२३५०२३२०, E-nilepratik02@gmail.com

# सफाई कर्मचाऱ्यांना वारसांना वारसा हक्काने मिळणार नोकरी

## आयुक्त तथा संचालक अभिषेक कृष्णा यांच्या स्वाक्षरीने आदेश निर्गमित

### महाराष्ट्र राज्य नगरपरिषद नगरपंचायत व संवर्ग कर्मचारी संघर्ष समितीच्या पाठपुराव्याला यश

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**

महाराष्ट्र राज्य नगर परिषद नगरपंचायत कर्मचारी संघर्ष समितीच्या वतीने आयुक्त तथा संचालक अभिषेक कृष्णा (भाप्रसे) यांचे राज्यातील नगरपरिषदा आणि नगरपंचायती मधील हजारो सफाई कामगारांकडून आभार व्यक्त करण्यात येत आहे.दि. ९ सप्टेंबर २०२५ रोजी संचालक कार्यालय येथे सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना वारसाहक्काने नोकरी देणे बाबत चर्चा झाल्यानंतर वारसा हक्काने नियुक्ती करणे बाबत दि. १० सप्टेंबर २०२५ रोजी आगदी दुसऱ्याच दिवशी आयुक्त तथा संचालक अभिषेक कृष्णा यांच्या स्वाक्षरीने आदेश निर्गमित झाले आहे. महाराष्ट्र राज्य नगरपरिषद नगरपंचायत व संवर्ग कर्मचारी संघर्ष समितीच्या वतीने कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्याबाबत दिनांक ९ सप्टेंबर २०२५ रोजी नगरपालीका प्रशासन संचालनालय येथे प्रदीर्घ काळापासून प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी धरणे आंदोलन करण्याचा निर्णय संघर्ष समितीने घेतला होता त्याअनुषंगाने आयुक्त तथा संचालक अभिषेक कृष्णा, नगर परिषद प्रशासन संचालनालय नवी मुंबई त्यांच्यासोबत अनेक विषयांवर चर्चा झाली त्यापैकी एक सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसाहक्काने नियुक्ती बाबतही चर्चा करण्यात आली होती कारण महाराष्ट्रातल्या सर्व सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना वारसा हक्काने नियुक्ती देण्याबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दि.२४/२/२०२३ रोजी आदेश काढला होता परंतु उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी रिट याचिका क्रमांक ३२०४/२३ ने स्थगिती दिल्याने गेल्या दोन ते तीन वर्षापासून वारसा हक्काने नियुक्ती थांबल्या होत्या परंतु संघर्ष समितीच्या माध्यमातून औरंगाबाद खंडपीठ येथे संघर्ष समितीचे नेते डॉ. डी. एल. कराड यांच्या मार्गदर्शनाखाली अँड सुरेश ठाकूर, मुख्य संघटक संतोष पवार, अनिल जाधव यांनी औरंगाबाद खंडपीठ येथे चालू असलेल्या रिट याचिके मध्ये प्रत्येक तारखेला उपस्थित राहून सरकारतर्फे सिनियर कौन्सिल ड विजयकुमार सकपाळ व विविध कर्मचारी संघटनांमार्फत योग्य म्हणणे सादर करून या बाबतचा पाठपुरावा करण्यासाठी महत्वपूर्ण प्रयत्न करण्यात आले. मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने दि. ८ जानेवारी २०२५ स्थगिती आदेश उठवून महाराष्ट्र राज्यातील सर्व सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना वारसाहक्काने नियुक्ती करण्याबाबतचा मार्ग सुकर केला होता. यावर शासनाचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिनांक २८/१/२०२५ रोजी नियुक्ती



करण्याबाबत आदेश काढला होता. परंतु आजही अनेक नगरपालिकेमध्ये औरंगाबाद खंडपीठ यांनी स्थगिती आदेश उठवून ही तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने सुस्पष्ट आदेश काढलेले असतानाही बहुतांश नगरपरिषदा आणि नगरपंचायती मधील मुख्याधिकारी यांच्या कडून वरिष्ठ स्तरावर अभिप्राय मागविण्यात येत होते आणि अभिप्राय न मिळाल्याने प्रकरणे गेले वर्षभर प्रलंबीत ठेवण्यात आली होती त्यामुळे राज्यातील सफाई कामगारांच्या वारसांचे न भरुन निघणारे नुकसान होत होते या बाबींचा गांभीर्याने विचार करून सफाई कर्मचाऱ्यांना वारसांवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी आयुक्त तथा संचालक अभिषेक कृष्णा यांच्यासोबत संघटनेच्या पदाधिकारी समवेत दि. ९/९/२०२५ रोजी सविस्तर चर्चा करत असताना राज्यातील सफाई कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती बाबत आढावा घेण्यात आला. यावेळी अनेक नगरपालिकांमध्ये सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना नियुक्ती दिली नसल्याबाबतची बाब यावेळी आयुक्त तथा संचालक अभिषेक कृष्णा या संवेदनशील अधिकारी म्हणून नाव लौकीक अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आली होती. तसेच सफाई कर्मचाऱ्यांची नियुक्ती देताना महाराष्ट्रातील जवळजवळ १०० पेक्षा अधिक नगरपालिकांनी संचालनालयाकडे मार्गदर्शन मागवले होते व त्यामुळे नियुक्ती देण्यास विलंब केला जात होता याची दखल घेत आयुक्त तथा संचालक अभिषेक कृष्णा यांनी सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना वारसाहक्काने नियुक्ती करणे बाबत त्वरित दि.१० सप्टेंबर २०२५ रोजी आदेश काढले असून आदेश काढूनही सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना नियुक्ती न दिल्यास संबंधित मुख्याधिकारी यांना व्यक्तिशः जबाबदार धरून त्यांच्यावर योग्य ती कारवाई केली जाईल असे सुस्पष्ट नमूद केले आहे. आयुक्त तथा संचालक अभिषेक कृष्णा यांनी या घेतलेल्या निर्णयामुळे महाराष्ट्रातील सर्व सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना त्वरित नियुक्ती मिळणार आहेत त्यामुळे सर्व महाराष्ट्रातील सफाई कर्मचाऱ्यांच्या वतीने आयुक्त तथा संचालक अभिषेक कृष्णा आणि संघर्ष समितीचे सर्व नेते डॉ डि एल कराड, ड सुरेश ठाकूर, रामेश्वर वाघमारे, रामगोपाल मिश्रा, ड सुनील वाळूंजकर, श्रावण जावळे, अनिल जाधव, अनिल पवार , आण्णा पाटील, सक्रिय पाठिंबा देणारे संवर्ग कर्मचारी संघटनेचे कैलास चव्हाण, आणि या संघर्ष समितीचे मुख्य संघटक संतोष पवार आणि सर्व लढाऊ कामगार प्रतिनिधीं जितेंद्र विचारे, सचिन रसाळकर, भूषण काबाडी, सुभाष कदम, केशव बुजवणे, देवा, शशिकांत मोरे, सुभाष जाधव यांचे अभिनंदन राज्यातील हजारो सफाई कामगारांच्या वतीने करण्यात येत आहे.

---

## खडकी–नंदादेवी परिसरात बिबट्याचे दर्शन

# ग्रामस्थांमध्ये भीती; दौंडच्या पूर्व भागात प्रथम बिबट्या दिसला

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**

दौंड तालुक्यातील खडकी व नंदादेवी परिसरात बिबट्याचे दर्शन झाल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. स्थानिकांच्या माहितीनुसार, बिबट्या दौंडच्या पूर्व भागात प्रथम दिसला आणि त्यानंतर खडकी–नंदादेवी परिसरात फिरताना दिसून आला.गेल्या काही दिवसांपासून परिसरात पाळीव प्राण्यांचे अचानक गायब होणे, कुत्र्यांचे भेसूर आवाजात भुंकणे अशा घटना घडत होत्या. यावरून परिसरात काहीतरी जंगलातील वन्यप्राणी वावरत असल्याचा संशय ग्रामस्थांना होता. अखेर काल रात्री उशिरा एका शेतकऱ्याने बिबट्याला प्रत्यक्ष पाहिलं आणि त्याचा व्हिडिओ देखील सोशल मिडियावर व्हायरल झाला.वनविभागाला या घटनेची माहिती देण्यात आली असून त्यांनी तत्काळ घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला आहे. बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी परिसरात सापळे (कॅमेरे व पिंजरे) लावण्यात येत



आहेत.

**ग्रामस्थांचे मागणे:** ग्रामस्थांनी वनविभागाकडे मागणी केली आहे की, बिबट्याला तात्काळ पकडून सुरक्षित ठिकाणी हलवावे. शाळकरी मुलांपासून महिलांपर्यंत सर्वजण भयभीत असून, संध्याकाळी घराबाहेर न पडण्याचा निर्णय अनेकांनी घेतला आहे.

**वनविभागाची प्रतिक्रिया:** वनअधिकाऱ्यांनी सांगितले की, बिबट्या भटकून मानववस्तीत आला असावा. सध्या त्याला पकडण्यासाठी प्रयत्न सुरू असून ग्रामस्थांनी घाबरून न जाता सावधगिरी बाळगावी.

---

# दिवा एक जंक्शन चरित्र व चारित्र्य पुस्तक प्रकाशन सोहळा २० सप्टेंबरला

## ज्येष्ठ साहित्यिक डॉ.श्रीपाल सबनीस यांची विशेष उपस्थिती

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क ०**

सन ३ एप्रिल १८६७ रोजी सुरु झालेले दिवा रेल्वे स्थानक अर्थात दिवा एक जंक्शन चरित्र व चारित्र्य पुस्तक प्रकाशन सोहळा येत्या २० सप्टेंबर २०२५ रोजी होत आहे. दिवा शहरातील साऊथ इंडियन इंग्लिश स्कूल व रेनबो इंग्लिश स्कूल तसेच सिनेरामा प्रकाशन आयोजित दिवा एक जंक्शन चरित्र आणि चारित्र्य हे दिवा गांवावर आधारीत लेखक राम माळी आणि सुधीर राऊत यांनी लिहलेल्या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा शनिवार, २० सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता विठ्ठल मंदिर, साबेगाव रोड, दिवा पूर्व येथे सन्माननीय पाहुणे ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या शुभ हस्ते




संपन्न होणार आहे.एक काळ असा होता की दिव्यात रहायला यायला पूर्वी माणसं घाबरायची शे–पाचशे लोकांचा असलेला आगरी कोळी समाज बांधवांचा दिवा गांव होता.. विविध कारणांनी बदनाम झालेला दिवा... कुप्रसिद्ध असा दिवा... ही पूर्वीच्या दिव्याची ओळख होती... अनेक वर्षापूर्वी दिव्यात राहायला येण्या आधी माणसं एकमेकांत बोलायची... काय दिवा ? नको रे बाबा.... आणि आज परिस्थिती नेमकी उलटी झालेली आहे. दिव्यात लोंढेच्या लोंढे माणसं राहायला येत आहेत. मध्य रेल्वे स्थानकावरील ठाणे डोंबिवली पाठोपाठ प्रचंड गर्दीचे रेल्वे स्थानक म्हणून दिवा जंक्शनकडे पाहिले जाते. अनेक मोठ मोठ्या राजकीय पक्षाच्या व्यक्तींची मतदानाचे आराखडे आता दिव्यातून बांधले जातात... का ? याची कारणं काय आहेत ? कोणत्या कारणांमुळे ही गर्दी वाढली ? आणि का ? असं पूर्वी काय घडत होतं दिव्यात ? आणि आता काय घडतं आहे दिव्यात ? हे जाणून घेण्यासाठी तुम्हाला दिवा एक जंक्शन चरित्र आणि चारित्र्य वाचायला हवे असे लेखक राम माळी व सुधीर राऊत यांनी बोलताना स्पष्ट केले असून सदर पुस्तक प्रकाशन सोहळ्याला अनेक मान्यवर उपस्थित राहणार असून सर्व दिवा वासीयांनी उपस्थित राहून दिव्यातील गुपिते जाणावी असे आवाहन केले आहे.

---

# महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून चोरट्यांचा पळ; दोन आरोपी अटकेत

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**

काझड (इंदापूर) येथे किराणा दुकानात एकटी असलेल्या वयोवृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र जबरदस्तीने हिसकावून पलायन केलेल्या दोघा चोरट्यांना वालचंदनगर पोलिसांनी शिताफीने अटक केली. तपासादरम्यान तब्बल १०० हून अधिक सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करण्यात आली. चोरटे बारामती तालुक्यातील असून, गुन्हा केल्यानंतर काही दिवसांतच त्यांना अटक करण्यात आली आहे. ही घटना दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ रोजी घडली. सौ. सिंधु काशिनाथ नरूटे (वय ६०, रा. काझड) या त्यांच्या घराशेजारील 'आर्या किरणा जनरल स्टोअर्स'मध्ये किराणा सामान खरेदी करत होत्या. त्यावेळी दोन तरुण युनिकॉर्न दुचाकीवरून दुकानात आले. त्यातील एकाने सामान घेण्याच्या बहाण्याने दुकानात प्रवेश केला आणि



संधी साधत सिंधुताईंच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून तुटवले. त्यानंतर दुचाकीवरून दोघेही पसार झाले.याप्रकरणी वालचंदनगर पोलीस ठाण्यात गु. र. नं. २९०/२०२५, भादंवि कलम ३०९ (४), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक मिलींद मिठापल्ली यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरु झाला. सीसीटीव्ही फुटेज व साक्षीदारांच्या मदतीने आरोपींचा शोध घेण्यात आला.तपासादरम्यान बारामती तालुक्यातील गुणवडी येथील रोहित विजय बोरकर (वय २१) यास ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याने सांगितल्यानुसार त्याचा साथीदार रोहित ऊर्फ कोच्या दिपक कुदळे (वय २०, रा. बांदलवाडी) यासही अटक करण्यात आली. न्यायालयाने दोघा आरोपींना ११ सप्टेंबर २०२५ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.तपासादरम्यान आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेली युनिकॉर्न दुचाकी, हिसकावलेले सोन्याचे मंगळसूत्र, मोबाईल फोन व रोख रक्कम असा एकूण मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.ही कामगिरी पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, व उपविभागीय अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि राजकुमार डुणगे, पोउनि मिलींद मिठापल्ली, पो.ह. गुलाबराव पाटील, शैलेश स्वामी, जगदीश चौधरी, सतीश फुलारे, विक्रमसिंह जाधव, गणेश वानकर, रणजित देवकर, अभिजीत कळसकर यांनी बजावली.

---

## चेंबूरकर तरुणाची जागतिक रंगमंचावर

# गाजलेली ताकद पॉवरलिफ्टिंग मध्ये ऐतिहासिक कामगिरी!

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**

मुंबईकरांची छाप आता जगभर झळकतेय. क्रीडा क्षेत्रातले अनेक विक्रम मोडत, भारताचा झेंडा उंचावणारा एक चेंबूरचा तरुण आता जागतिक पातळीवर चर्चेत आला आहे. ही केवळ वैयक्तिक जिद्द नाही, तर संपूर्ण देशाच्या अभिमानाचा क्षण ठरला आहे.अमेरिकेतील कोस्टा रिका, सॅन होजे येथे नुकतीच वर्ल्ड सब ज्युनियर आणि ज्युनियर क्लासिक आणि इक्विप्ड पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप २०२५ पार पडली. जगभरातील तगड्या खेळाडूंमध्ये भारतीय प्रतिनिधी म्हणून उभा राहिलेला चेंबूरचा रहिवासी चैतन्य पंदेकर आपल्या दमदार कामगिरीने अव्वल ठरला.अत्यंत कठोर सराव, शिस्त आणि मानसिक ताकद यांच्या जोरावर चैतन्यने मैदानात जे दाखवलं, ते जागतिक स्तरावर भारतीय तरुणाईची ताकद अधोरेखित करणारं ठरलं. ६६ किलो इक्विप्ड गटात त्याने जबरदस्त झुंज देत



डेडलिफ्टमध्ये सिल्वर मेडल पटकावलं आणि ओव्हरल ४ था क्रमांक मिळवत भारताचा झेंडा उंचावला.२५ ऑगस्ट ते ५ सप्टेंबरदरम्यान झालेल्या या स्पर्धेत चैतन्यच्या विजयामुळे पॉवरलिफ्टिंग इंडियाला आंतरराष्ट्रीय रंगमंचावर मानाचं स्थान मिळालं आहे.थोडक्यात चेंबूरचा चैतन्य पंदेकर आता जगभरातल्या पॉवरलिफ्टिंग विश्वात नवा आदर्श ठरला आहे!

---

# तिनवीरा दरोडा प्रकरण! पोलीस हवालदार सूर्यवंशी यांना उच्च न्यायालयाकडून अटकपूर्व जामीन मंजूर

**कर्जत । प्रतिनिधी**

तिनवीरा दरोडा व दीड कोटी रुपयांच्या कथित फसवणूक प्रकरणात अडकविण्यात आलेल्या गुन्हयात अलिबाग पोलिस ठाण्यातील तत्कालीन पोलिस हवालदार हनुमंत सूर्यवंशी यांना मुंबई उच्च न्यायालयाने ८सप्टेंबर रोजी अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे . त्यांच्या वतीने अॅड दीपक नातू यांनी वकिलपत्र घेऊन मुंबई उच्च न्यायालयात अटकपूर्व अर्ज दाखल केला होता. त्याची सुनावणी उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या समोर घेण्यात आली. यावेळी अॅड दीपक नातू व अॅड गायत्री सोनी यांनी न्यायालसमोर अनेक मुद्दे उपस्थित करत युक्तिवाद केला.या सुनावणीत अर्जदार तपासाच्या बाबतीत ते कोणताही हस्तक्षेप करणार नाहीत. पूर्ण सहकार्य करतील, असे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले याचा युक्तिवाद ग्राह्य मानत न्यायालयाने अटी व शर्तींच्या आधारावर आधी २५ जून २०२५ रोजी एक अंतरिम तात्पुरता (हंगामी)आदेश दिला होता त्यात न्यायालयाने सुर्यवंशी यांना अटक न करण्याचा तात्पुरता दिलासा दिला होता. एक ते तीन जूलै या कालावधीत त्यांनी तपास कार्यात सहकार्य व अधिकाऱ्यांसमोर हजर राहण्याचे आदेश दिले होते.

अलिबाग तालुक्यातील तिनविरा धरणाजवळ चार फेब्रुवारी २०२५ रोजी झालेल्या दरोडा प्रकरणात आमदारांच्या रक्षकांचा समावेश असून त्यांच्याविरोधात पोयनाड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यात समाधान पिंजारी याचा समावेश असून आमदार महेंद्र दळवी यांच्या बंगल्यावर कामगार म्हणून कार्यरत होता. विधानसभा निवडणूकीपुर्वी झालेल्या सुमारे पाच कोटी रुपयांच्या फसवणूक प्रकरणात मदतीसाठी आमदार दळवी यांनी पोलिस ठाण्याशी संपर्क केला होता. त्यासंदर्भात समाधान पिंजारी ५ फेब्रुवारी रोजी अलिबाग पोलिस ठाण्यात आला होता. पोलिस निरीक्षक किशोर साळे यांच्याशी भेट घेतली. त्यावेळी हनुमंत सूर्यवंशी हे देखील एका गुन्ह्याची कागदपत्रे घेऊन निरीक्षकांकडे गेले होते. निरीक्षक साळे यांच्या सूचनेनुसार सूर्यवंशी यांनी समाधान पिंजारीकडून माहिती घेतली. नामदेव हुलगे या आरोपीशी संपर्क साधून पैसे परत करण्यास सांगितले. संबंधित नोंदी पोलिस स्टेशनच्या रजिस्टरमध्ये केल्या गेल्या होत्या. सूर्यवंशी यांनी पिंजारीला नोटीस देऊन ६ फेब्रुवारी रोजी पोलीस ठाण्यात हजर राहण्यास सांगितल होते. तो त्यादिवशी पोलिस ठाण्यात येऊन जबाब देखील देऊन गेला. नामदेव हुलगे याच्या नातेवाईकांना फोन करून धमकी दिल्याचा आरोप सूर्यवंशी यांच्यावर ठेवण्यात आला होता. परंतु, संबंधित कॉल तपास पोलीस अधिकाऱ्याच्या निर्देशावरून अधिकृत नोंदीनुसार करण्यात आला असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. सुर्यवंशी यांच्या वकीलाने केलेल्या युक्तीवादात न्यायालयासमोर अनेक पुरावे सादर केले. अर्जदाराची भूमिका केवळ सह–आरोपींच्या कटात कथित सहभागापुरती मर्यादित आहे. त्यांचा असा युक्तिवाद आहे की अर्जदाराने केलेला फोन कॉल प्रत्यक्षात तपास अधिकाऱ्यांच्या सांगण्यावरून करण्यात आला होता, जो खटल्याच्या डायरीत नोंदवला गेला आहे. त्यामुळे, अर्जदाराला सह–आरोपींनी केलेल्या प्रत्यक्ष गुन्ह्याशी जोडणारा कोणताही थेट पुरावा रेकॉर्डवर नाही. हि महत्वपूर्ण बाब लक्षात घेऊन न्यायालयाने २५ जून २०२५ रोजी एक अंतरिम तात्पुरता आदेश दिला होता, ज्यानुसार अर्जदाराने तपासात सहकार्य केले आहे आणि असे सहकार्य पुढे सुरू ठेवण्यास तयारी दर्शवली होती. या आधारावर, ते अर्जदाराला देण्यात आलेले अंतरिम संरक्षण चालू राहावे असाही युक्तिवाद न्यायालयात अॅड दीपक नातू यांनी केला.न्यायमुर्ती बोरकर यांनी सदरचा युक्तिवाद ग्राह्य मानत अर्जदार तपास अधिकाऱ्याकडे हजर राहिला आहे आणि त्याने तपासात सहकार्य केले आहे. त्यामुळे अर्जदाराची पुढील कोठडीत चौकशी आवश्यक नाही.त्यामुळे अर्जदाराचा ८ सप्टेंबर २०२५ रोजी अटकपूर्व जामीन मंजूर केला असून सदरचा अर्ज न्यायालयाने निकाली काढण्यात आला आहे.

# जांभोरा गावचा वैभव,दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये पीएच डी.प्रवेश आणि जिजस अँड मेरी कॉलेजमध्ये असिस्टंट प्रोफेसर

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**सिंदखेड राजा । रामदास कहाळे**

बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा तालुक्यातील जांभोरा या छोट्याशा गावातील अल्पभूधारक शेतकरी दिलीप खरात यांचे चिरंजीव वैभव माया दिलीप खरात या सुपुत्राने देशातील सर्वात प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थांपैकी एक असलेल्या दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स, नवी दिल्ली येथे डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (झह.ऊ) अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळवत आपल्या मेहनतीच्या जोरावर संपूर्ण मातृतीर्थ सिंदखेडराजा तालुक्याची मान उंचावली आहे.वैभव खरात यांचं शिक्षण प्राथमिक शाळा जांभोरा , बारावी कै. तुकाराम कांयदे विद्यालय रूम्हणा, आणि पदवीचे शिक्षण फर्ग्युसन कॉलेज पुणे, तर पदवीवुतर शिक्षण जवाहरलाल नेहरू विश्वविद्यालय ( गछण ), नवी दिल्ली येथे झाले , आणि तिथेच दिल्लीतीलच नामांकित जिजस अँड मेरी कॉलेज मध्ये असिस्टंट प्रोफेसर म्हणून निवड मिळवून एकाच वेळी दुहेरी यश संपादन केले आहे.

**दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स – एक प्रतिष्ठित परंपरा**




'दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' ही संस्था देशाच्या बौद्धिक जीवनाचा कणा मानली जाते. भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग हे या संस्थेचे विद्यार्थी व प्राध्यापक राहिलेले आहेत. या संस्थेत प्रवेश मिळणे हेच कोणत्याही विद्यार्थ्यासाठी मोठा सन्मान मानला जातो. अशा संस्थेत जांभोऱ्यासारख्या छोट्या गावातील एका शेतकरी कुटुंबातील युवकाने स्थान मिळवणे ही अत्यंत अभिमानाची बाब आहे.

**जिजस अँड मेरी कॉलेज – नवी दिशा**

याचबरोबर वैभव खरात यांची निवड दिल्ली विद्यापीठाशी संलग्न असलेल्या प्रसिद्ध जिजस अँड मेरी कॉलेज मध्ये असिस्टंट प्रोफेसर म्हणून झाली आहे. या महाविद्यालयाचे अनेक माजी विद्यार्थी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्यरत आहेत. विशेष म्हणजे, मा. प्रियंका गांधी या देखील या महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी आहेत.

**शेतकरी कुटुंबातून शैक्षणिक शिखरावर**

वैभव खरात यांचा प्रवास सोपा नव्हता. अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातून आलेल्या या युवकाने शैक्षणिक टप्प्यावर एकामागून एक यश संपादन करत आज देशातील सर्वोच्च शैक्षणिक संस्थेत आपले नाव कोरले आहे. यामध्ये कुटुंबाचा त्याग, शेतकरी वडिलांची कष्टाळू वृत्ती, आणि स्वतःची मेहनत व चिकाटी या सर्वांचा मोलाचा वाटा आहे.

**स्थानिक पातळीवर आनंदाचा माहोल**

या यशामुळे जांभोरा गावात तसेच संपूर्ण सिंदखेड राजा तालुक्यात आनंदाचे वातावरण आहे. गावकऱ्यांनी, शिक्षकांनी आणि नातेवाईकांनी वैभव यांचे कौतुक केले आहे. शेतकऱ्याचा मुलगा देखील उच्च शिक्षणाच्या शिखरावर पोहोचू शकतो, ही प्रेरणादायी कामगिरी आहे, अशा भावना अनेकांनी व्यक्त केल्या.

**भविष्यातील वाटचाल**

देशाच्या आर्थिक व सामाजिक घडामोडींमध्ये दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सची मते व अभ्यास महत्वाचा ठरतो. अशा संस्थेत पीएच.डी. संशोधन करणार आणि पुढे प्राध्यापक म्हणून तरुण पिढीला मार्गदर्शन करणार, हे निश्चितच महाराष्ट्रासाठी आणि बुलढाणा जिल्ह्यासाठी अभिमानास्पद आहे.जांभोरा गावच्या मातीतून उगवलेला वैभव खरात हा केवळ आपल्या कुटुंबाचा अभिमान नाही, तर संपूर्ण महाराष्ट्राच्या युवकांसाठी प्रेरणादायी दीपस्तंभ आहे. शेतकऱ्याच्या घामातून उमललेले हे यश दाखवते की, परिस्थिती काहीही असो – मेहनत, जिद्द आणि स्वप्नांवरचा विश्वास असेल तर शिखर गाठणे अशक्य नाही!

# शेगाव येथील ओबीसी अधिकारी कर्मचारी संघाच्या राज्य अधिवेशनास उपस्थित राहा–जिल्हाध्यक्ष किशोर पवार

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**बुलडाणा । प्रतिनिधी**

ओबीसी अधिकारी कर्मचारी संघाचे तिसरे राज्य अधिवेशन व एक दिवसीय चिंतन शिबिर येत्या रविवारी दि. १४ सप्टेंबर २०२५ रोजी मातृतिर्थ बुलडाणा जिल्ह्यातील संत नगरी शेगाव येथे आयोजित करण्यात आले असून मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष किशोर पवार यांनी केली आहे.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सुनिल शेळके भूषवणार असून प्रमुख वक्ते म्हणून युनिटी ऑफ मूलनिवासी साजाचे राष्ट्रीय अध्यक्ष कमलकांत काळे तसेच माजी असिस्टंट कमिशनर, जीएसटी विभाग व एससी, एसटी ओबीसी कर्मचारी वेलफेअर फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष संजय थुल मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्षपद संघाचे जिल्हाध्यक्ष किशोर पवार भूषवतील.



पहिल्या सत्रात ओबीसी आरक्षण : सामाजिक लढा व आताची परिस्थिती आणि अधिकारी व कर्मचारी यांच्या समोरील आव्हाने या विषयांवर चर्चा होईल. दुसऱ्या सत्रात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा, सामूहिक चर्चा, पुढील दिशा, ठराव आणि समारोपाचा कार्यक्रम होणार आहे. हा कार्यक्रम शेगावमध्ये खामगाव रोडवर असलेल्या विघ्नहर्ता हॉटेल येथे सकाळी १० वाजता सुरू होऊन सायंकाळी ४.३० पर्यंत चालणार आहे. संघटनेच्या वतीने जिल्ह्यातील सर्व ओबीसी अधिकारी व कर्मचारी बांधवांनी या अधिवेशनाला मोठ्या संख्येने उपस्थित राहून हे अधिवेशन व चिंतन शिबिर यशस्वी करण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष किशोर पवार यांनी केले आहे

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम विशेष पुरस्काराने मुंढर–कातकरी ग्रामपंचायत सन्मानित

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**गुहागर । रामदास धो. गमरे**

संत गाडगेबाबा महाराज स्वच्छता अभियान हा देशातील एक महत्त्वाचा उपक्रम असून महाराष्ट्र शासनाने ग्रामीण भागात स्वच्छता आणि जनजागृती करणे व सामूहिक सहभागातून गावचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी व स्वच्छतेचा आदर्श निर्माण करणाऱ्या गावांना सन्मानित करण्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा सारख्या स्पर्धांची निर्मिती केली आहे. या स्पर्धेअंतर्गत गावात स्वच्छता ठेवणे, कचरा व सांडपाणी व्यवस्थापन करणे, निर्जंतुकीकरता वेळच्यावेळी फवारणी करणे व ग्रामस्थांना स्वच्छतेचे महत्व पटवून देत जनजागृती करणे या निकषांवर गुण दिले जातात.

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत संत तुकडोजी महाराज स्वच्छता ग्रामीण स्पर्धेत वरील निकषांवर सातत्याने खरे उतरणाऱ्या ग्रामपंचायत मुंढर–कातकिरीस यंदाच्या वर्षी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा अंतर्गत जिल्हास्तरावर विशेष पुरस्कार




प्रदान करण्यात आला आहे. त्याबद्दल गुहागर चिपळूण खेड विधानसभेचे माननीय आमदार, माजी मंत्री, रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री भास्करराव जाधव यांच्या शुभहस्ते गुहागर पंचायत समितीच्या आमसभेत मुंढर–कातकीरी गाव, ग्रामस्थ व ग्रामपंचायतीस लोकप्रतिनिधी मुंढर गावच्या आदर्श सरपंचा सौ. अमिषा अमित गमरे व ग्रामसेवक सुरेश गोरे यांना सन्मानित करण्यात आले.

सदर सन्मानामुळे जिल्हा व तालुका स्तरावर मुंढर–कातकरी ग्रामपंचायतीच्या कार्याची प्रशंसा होत असून गावातील स्वच्छता व सामाजिक विकासासाठी त्यांच्या योगदानाकडे आदर्श म्हणून पाहिले जात आहे. ग्रामपंचायतीच्या प्रामाणिक व पारदर्शक कार्यप्रणालीमुळे आणि स्वच्छता अभियानातल्या सातत्यपूर्ण योगदानामुळे हा विशेष पुरस्कार प्राप्त झाल्याचे मानले जात आहे.

# मंडणगड येथील शिगवण स्मशानभूतील बेकायदेशीर टॉवर उभारण्या विरोधात तहसील कार्यालयत निवेदन

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**मंडणगड । प्रतिनिधी**

मंडणगड तालुक्यातील ग्रुपग्रामपंचायत शिगवण यांच्या हद्दीमध्ये असलेले चक्रवर्ती सम्राट अशोक नगर व आदिवासी वाडी, शिगवण यांच्या पिढ्यानपिढ्या असलेल्या स्मशानभूमीत चुकीच्या पद्धतीने ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी ठराव मंजूर करून स्वतःची मनमानी करत बीएसएनएल टॉवर उभारण्याकरिता परवानग्या दिल्या आहेत. ही बाब ग्रामस्थांच्या लक्षात आल्यानंतर ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीला हरकत घेण्याकरिता पत्र दिले आहे व त्याच्या प्रती गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मंडणगड यांच्याकडे दिल्या आहेत. तसेच सदर घटनेची चौकशी करण्याकरिता तहसीलदार, तहसील कार्यालय मंडणगड येथे वारंवार पत्रव्यवहार करून अद्याप शिगवण गावातील ग्रामस्थांना कोणत्याही प्रकारचा न्याय मिळालेला नाही.



सदर घटनेची चौकशी करून येत्या १५ दिवसाच्या आत मध्ये संबंधित असलेल्या ग्रामसेवक, सरपंच तसेच बीएसएनएल कंपनीच्या अधिकाऱ्यांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर कायदेशीर कार्यवाही करावी. तसेच शिगवण स्मशानभूमीमध्ये हरकत असताना सुद्धा उभारण्यात आलेला टॉवर तत्काळ हटविण्यात यावा.असे निवेदन पत्र तहसील कार्यालयात देण्यात आले.

तसेच अनुसूचित जाती, जमाती व नवबौद्ध घटकांच्या भावनांशी खेळणाऱ्या अधिकाऱ्यांवरती कार्यवाही न झाल्यास १५ ऑक्टोंबर २०२५ रोजी तहसील कार्यालयावरती अधिकाऱ्यांविरोधात आक्रोश मोर्चा काढण्यात येईल, तसेच सदर मोर्थ्यांच्या वेळेस होणाऱ्या परिणामास संबंधित अधिकारी व प्रशासन जबाबदार राहील असे सदरच्या निवेदनात म्हटले आहे. निवेदन सादर करताना अध्यक्ष अरविंद येलवे, भरत सरपरे, अभय पिचुर्ले, विश्वास सुगदरे , रजनिकांत धोत्रे,सचिन धोत्रे, मयुरेश धोत्रे आणि सिकंदर बुरूड आदी उपस्थित होते.

# धम्मध्वज यात्रेचे नेतृत्व भंते विनाचार्य यांना इंदुमती महिला मंडळाकडून दान

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**परभणी । संजय बगाटे**

महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनासाठी राज्यभर सुरू असलेली भंते विनाचार्य यांची धम्म ध्वज यात्रा काल परभणीत आली असताना प्रियदर्शनी नगर येथील इंदुमती महिला मंडळाकडून विनाचार्य यांना दान करण्यात आले.प्रियदर्शनी नगर येथील उपासिकांनी जसे जमेल तसे संपूर्ण नगरातून निधी जमा केला. यात कमलबाई भदर्गे शोभा जाधव रेखाबाई सपाटे शांताबाई लोणकरकाशीबाई बहिरट वेणूबाई कांबळे सीताबाई लांडगे विमलबाई थोरात सौमित्र नरवाडे छायाबाई गवळी ज्योती वायवळ सह इंदुमती महिला मंडळाकडून विनाचार्य यांचे स्वागत करून निधी सुपूर्द केला.



# बोदवड ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी विमल गव्हाणे यांची बिनविरोध निवड

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**सिल्लोड । जब्बार तडवी**

सिल्लोड तालुक्यातील बोदवड येथील तात्कालीन उपसरपंच सुनीता लाठे यांनी जात वैधता प्रमाणपत्र जिल्हाधिकारी कार्यालयात वेळेत सादर न केल्याने त्यांना अपात्र ठरवले होते. त्यामुळे सदरील जागा रिक्त झाली होती ,त्यामुळे नवीन उपसरपंच ही जगा निवड करण्यासाठी दिनांक ११ सप्टेंबर २०२५ रोजी बोदवड ग्रामपंचायत कार्यालयात



उपसरपंच निवडीची निवडणूक प्रक्रिया घेण्यात आली. या वेळेस मंडळ अधिकारी प्रभाकर चव्हाण,तलाठी जी, एस फरकाडे, ग्रामसेवक ऐ एस भवते यांनी निर्वाचन अधिकारी म्हणून काम पाहिले, या वेळेस सरपंच गजेंद्र पंडित, ग्रामपंचायत सदस्या , जिजाबाई लक्ष्मणराव गव्हाणे, सुनिता तुकाराम गव्हाणे, बबीता देवाजी गव्हाणे, चेअरमन राहुल गव्हाणे, माजी सरपंच नाना ढाले, नवनाथ गव्हाणे, समाधान लाठे, डॉ प्रशांत गव्हाणे, तुकाराम गव्हाणे ,पांडुरंग गव्हाणे, भगवान गव्हाणे आदींनी नवनिर्वाचित उपसरपंचाचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या,

# धडक अबेट मोहीम: डेंग्यू, हिवताप व मलेरिया प्रतिबंधासाठी विशेष जनजागृती मोहिमेचे आयोजन

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका मलेरिया विभागाच्या तर्फे डेंग्यू, हिवताप व मलेरिया प्रतिबंधासाठी विशेष धडक अबेट मोहीम झोन क्र. ०८ सातारा देवळाई परिसरात यशस्वीपणे राबविण्यात आली. ही मोहीम डॉ. पारस मंडलेचा यांच्या आदेशानुसार, जिवशास्त्रवेत्ता डॉ. सय्यद सुमैया नाझ यांच्या सूचनेनुसार व झोनल मलेरिया पर्यवेक्षक शेख अन्वर शेख दादाभाई यांच्या संयोजनात राबवण्यात आली.मोहिमेचा शुभारंभ आरोग्य केंद्र सातारा व देवळाई येथे वैद्यकीय अधिकारी डॉ. पल्लवी हिवराळे आणि डॉ. बंनसोडे यांच्या उपस्थितीत डेंग्यू प्रतिबंधात्मक शपथ घेऊन करण्यात आला. यानंतर फवारणी कर्मचारी व आशा वर्कर्स यांनी जनजागृती रॅली काढून मोहिमेची सुरुवात केली.मोहिमेअंतर्गत वार्ड क्र. ११४ व ११५ मधील अति जोखीम भागांमध्ये प्रभावी उपाययोजना करण्यात आल्या. प्रमुख भागांमध्ये बजाज हॉस्पिटल ते बाळापुर फाटा, सोलापूर हायवे, देवळाई गाव, जामा मस्जिद, पटेल गल्ली, पाटील गल्ली,




जमाल नगर, झिरा कॉलनी, साईनगर, सादत कॉलनी, मल्हार गल्ली, शक्य नगर व शंकरनगर यांचा समावेश होता.

प्रमुख उपाययोजना:
डेंग्यू, मलेरिया व हिवताप प्रतिबंधासाठी साथरोग सर्वेक्षण
अबेट ट्रीटमेंट व धूर व औषध फवारणी
कुलर, टाक्या, हौद तपासणी व स्टिकर लावणे
जनजागृती पम्फलेट वाटप
चडज ऑईल टाकणे व गप्पी मासे सोडणे
आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळण्याबाबत नागरिकांना सूचना
कंटेनर सर्वेक्षण व डास अळ्या नष्ट करणे

या मोहिमेमध्ये मलेरिया पर्यवेक्षक शेख अन्वर शेख दादाभाई, आरोग्य पर्यवेक्षक जनक हरणे, चझथ किरण धाटबळे, किटकसमाक भुषण भाले, इंचार्ज सिस्टर वैशाली बिरारे, फवारणी कर्मचारी शेख तैय्यब अन्वर, मनोज जगधने, भारत वाघ, रामनाथ रोकडे, देवळाईचे आशा वर्कर २२, साताराचे १५ कर्मचारी, एकूण ४० कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

ही प्रभावी मोहीम नागरिकांच्या आरोग्य सुरक्षिततेसाठी एक मोठा टप्पा ठरली असून, डेंग्यू, मलेरिया व हिवताप प्रतिबंधासाठी नागरिकांनीही सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले.

# बहुलखेडा अजगर हत्या प्रकरणी आरोपींना अटक करा

## वन्यजीव रक्षक संघटनेची सोयगाव तहसील कडे मागणी

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**सोयगाव । प्रतिनिधी**

बहुलखेडा शिवारात शेळी गिळंकृत केलेल्या अजगराचा ठेचून हत्या केल्या प्रकरणी सोयगाव वनविभागाकडून अद्यापही आरोपी अटक करण्यात आलेले नाही या मागणीसाठी शुक्रवारी वन्यजीव रक्षक संघटनेचे वतीने सोयगाव तहसील वर तासभर निदर्शने करून तातडीने आरोपी अटक करून संबंधित वन परिक्षेत्र अधिकारी अनिल मिसाळ यांच्यावर निलंबनाची कारवाई करा अशी मागणी लेखी निवेदनात केली आहे.

बहुलखेडा शिवारात शेळी गिळंकृत केलेल्या अजगराचा ठेचून हत्या करून त्याच्या पोटातून मृत शेळी बाहेर काढल्या चा प्रकार अज्ञातांनी केला होता त्या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता या घटनेला दहा दिवस उलटूनही अद्यापही सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओ मधील सात ते आठ आरोपीना वनविभागाने अटक केलेली नाही या मागणीसाठी शुक्रवारी वन्यजीव रक्षक रेस्कु सेंटर चे सचिव दिनेश गायकवाड, अध्यक्ष अतिष चांगरे यांच्या नेतृत्वाखाली सोयगाव तहसील कार्यालयात निवेदन देण्यात आले निवेदनवर संदीप इंगळे,ज्ञानेश्वर गाडेकर,अशोक ढगे,प्रथमेश बोडखे, रितेश गायकवाड, दिलीप शिंदे,मयूर रामेश्वर, वैभव बडगुजर, रवींद्र राठोड, संदीप चव्हाण आदींच्या स्वाक्षरी आहेत.